MHST200021852020

<u>रे.दि.मु.नं.२५६/२०२३ मधील निशाणी क्र.२७ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज तिऱ्हाईत इसमातर्फे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० व कलम १५१ अन्वये दाखल करण्यात आला आहे.

२. अर्ज व वादींचे म्हणणे याचे अवलोकन केले. तिऱ्हाईत इसमाच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. वादी व वादींचे विद्वान विधीज्ञ गैरहजर असल्याने त्यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला नाही.

३. तिऱ्हाईत इसमांचे असे कथन आहे की, दावा मिळकत ही तिऱ्हाईत इसम श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थान ट्रस्टची मालकी हक्काची असुन देवस्थानाची नोंद ७/१२ उताऱ्यावर आहे. वादी व प्रतिवादी यांची नावे दावा मिळकतीच्या रेकॉर्डवरुन बेकायदेशीर व्यवहार म्हणुन फेरफार नं.२२८९ अन्वये कमी झालेली आहेत. वादींचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध नाही. वादी हे तिऱ्हाईत इसमाविरुद्ध परस्पर हुकूम घेण्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज मंजुर करण्यात यावा व तिऱ्हाईत इसमास दाव्यात पक्षकार म्हणुन सामील करण्यात यावे.

४. उलटपक्षी, वादींचे असे कथन आहे की, तिऱ्हाईत इसमाने दिलेला अर्ज कोणत्या उपनियमाखाली दिलेला आहे व तिऱ्हाईत इसमाला काय म्हणुन सामील करावयाचे याबाबत कोठेही सुस्पष्ट व योग्य पद्धतीने कारण नमुद केलेले नाही. दावा मिळकत वादींच्या ताब्यात असुन त्यात त्यांची कब्जेवहिवाट आहे. दावा मिळकतीचा कर वादी भरत आहेत. केवळ दाव्यामध्ये अडचणी आणणे व ब्लॅकमेल करुन पैसे कमवणे एवढाच तिऱ्हाईत इसमाचा हेतु आहे. त्यामुळे त्यांनी अशी विनंती केली आहे की, सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा.

५. दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दावा मिळकत गट नं.३९ च्या ७/१२ उताऱ्यावर श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थान यांचे नाव भोगवटदार सदरी नमुद आहे. तसेच सदर जमीन देवस्थान इनाम असल्याने सक्षम प्राधिकार्याच्या पुर्व परवानगी शिवाय हस्तांतरास बंदी असा शेरा देखील ७/१२ उताऱ्यावर नमुद आहे. तसेच आरटीएस रिव्हीजन नं.१०७/२०१८ मध्ये सदर तिऱ्हाईत इसम म्हणजेच श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थान, महाबळेश्वर अर्जदार होते. परंतु, वादींनी त्यांना दाव्यात पक्षकार म्हणुन सामील केले नसल्याचे दिसुन येते. सदर दाव्याचा निकाल हा निश्चीतच तिऱ्हाईत इसमाच्या हक्क व अधिकारावर हस्तक्षेप करणारा राहणार आहे. त्यामुळे सदर तिऱ्हाईत इसमास त्याची बाजु मांडण्याची संधी देणे कायदयाने अपेक्षित आहे. वादींचा आक्षेप केवळ सदरचा अर्ज कुठल्या नियमाखाली व त्यांना काय म्हणुन सामील करायचे याबाबत दिसुन येतो. तिऱ्हाईत इसमाने त्याचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० अन्वये दाखल केलेला आहे. तसेच त्यांना प्रतिवादी म्हणुन सामील करण्यात यावे असा युक्तीवाद तिऱ्हाईत इसमाच्या विद्वान विधीज्ञांनी केला आहे. त्यामुळे वादींचे सदर आक्षेप फेटाळण्यास पात्र आहेत असे मला वाटते. परिणामी, मी या निष्कर्षास आलो आहे की, सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे-

## <u>आदेश</u>

(१) अर्ज नि.२७ मंजुर करण्यात येतो.

(२) तिऱ्हाईत इसम श्री क्षेत्र महाबळेश्वर देवस्थान, महाबळेश्वर यांना दाव्यात प्रतिवादी म्हणून वादींनी सामील करावे व आवश्यक ती दुरुस्ती करुन घ्यावी.

(३) खर्चाबाबत आदेश नाही.

ANKUSH ATMARAM PACHARNE
Digitally signed by ANKUSH ATMARAM PACHARNE
Date: 2025.04.05 17:25:01 +0530

वाई.
दि. ०४/०४/२०२५

( ए. ए. पाचरणे )
सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, वाई.